| MHYA070004692015 | दाखल दिनांक | : | ०९/०४/२०१५ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | ०९/०४/२०१५ |
| | निकाल दिनांक | : | ०६/०७/२०२६ |
| | कालावधी | : | ११ वर्ष ०१ म २७ दि |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र. २), दारव्हा, जि. यवतमाळ यांचे न्यायालय**

(पीठासीन अधिकारी श्री. निलेश ल. पाटील)

**(पारित दिनांक ०६ जुलै, २०२६)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ८५/२०१५**

**गुन्हा रजिस्टर क्र. २५४/२०१४. (दारव्हा पो. स्टे.)**

**निशाणी क्र. १८६.**

**अभियोग पक्ष** :

महाराष्ट्र सरकार, तर्फे

पोलीस ठाणे अधिकारी दारव्हा,

ता. दारव्हा, जि. यवतमाळ.

**सरकारतर्फे**:

**श्री. सी. बी. उके,**

**विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

**.. विरुध्द..**

**आरोपी :**

१. **नंदु नागोराव गायकवाड,**

**वय** – ४९ वर्षे, **व्यवसाय** – मजुरी,

२. **शिला नागोराव गायकवाड,**

**वय** – ४५ वर्षे, **व्यवसाय** – मजुरी

३. **गजानन नागोराव गायकवाड,**

**वय** – २१ वर्षे, **व्यवसाय** – शिक्षण,

४. **रामहरी नागोराव गायकवाड,**

**वय** – ४५ वर्षे, **व्यवसाय** – शिक्षण,

५. **अरुणा चंद्रकांत गायकवाड,**

**वय** – २५ वर्षे, **व्यवसाय** – मजुरी,

६. **छाया दत्ता ढोके,**

**वय** – २६ वर्षे, **व्यवसाय** – मजुरी

७. **विश्वनाथ परसराम गायकवाड,**

**वय** – ४५ वर्षे, **व्यवसाय** – मजुरी

८. **आशा विश्वनाथ गायकवाड,**

**वय** – ३५ वर्षे, **व्यवसाय** – मजुरी

९. **मयुरी विश्वनाथ गायकवाड**

**वय** – १९ वर्षे, **व्यवसाय** – शिक्षण,

**सर्व रा.** नखेगाव, ता. दारव्हा, जि. यवतमाळ

**आरोपीतर्फे** : **विधीज्ञ श्री टी. एम. खान वकील**

## न्या य नि र्ण य

१.

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ११/०७/२०१४ |
| प्रथम खबर दिनांक | ११/०७/२०१४ |
| दोषारोप दाखल केल्याचा दिनांक | १५/०५/२०१५ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | १५/०५/२०१४ |

| | |
|---|---|
| **पुरावा नोंदविण्यास सुरुवात केल्याचा दिनांक** | ०३/०८/२०१५ |
| **न्यायनिर्णयासाठी ठेवल्याचा दिनांक** | २९/०६/२०२६ |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | ०६/०७/२०२६ |
| **शिक्षेच्या आदेशाची तारीख असल्यास.** | लागु नाही. |

२. <u>आरोपीचा तपशील</u> :

| **आरोपींची रँक** | **आरोपींचे नावे** | **अटक केल्याचा दिनांक** | **जामीनावर सोडल्याचा दिनांक** | **गुन्हयाचा तपशील** | **शिक्षा किंवा निर्दोष** | **शिक्षा कालावधी** | **खटला चालू असल्याच्या दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधी, फौ.प्र.सं. कलम ४२८ साठी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | नंदु नागोराव गायकवाड | आरोपीस क्र. १ व ४ यास दिनांक २८/११/२०१४ रोजी व तसेच आरोपीस | आरोपीस क्र. १ व ४ यास दिनांक २८/११/२०१४ रोजी व तसेच आरोपीस क्र. २, ३, | भारतीय दंड सहितेचे कलम १४३, १४७, १४८, १४९ ३२६, | निर्दोष | निरंक. | लागू नाही |
| **२** | शिला नागोराव गायकवाड | | | | | | |
| **३** | गजानन नागोराव गायकवाड | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | रामहरी नागोराव गायकवाड | क्र. २, ३, ५ ते ९ यास दिनांक २६/११/२०१४ रोजी अटक केली. | ५ ते ९ यास दिनांक २६/११/२०१४ रोजी जामीनावर सोडले. | ५०४ अन्वये | | | |
| ५ | अरुणा चंद्रकांत गायकवाड | | | | | | |
| ६ | छाया दता ढोके | | | | | | |
| ७ | विश्वनाथ परसराम गायकवाड | | | | | | |
| ८ | आशा विश्वनाथ गायकवाड | | | | | | |
| ९ | मयुरी विश्वनाथ गायकवाड | | | | | | |

**३–अभियोग पक्षाचे साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/ न्यायालयाचे साक्षीदार असल्यास:**

**अ:– अभियोग पक्षाचे साक्षीदार:**

| रँक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| **सा. क्र. १/ नि. क्र. ६७** | गजानन अशोकराव ढवक | घटनास्थळ पंच |
| **सा. क्र. २/ नि. क्र. १०५** | गणेश रामराव पवार | फिर्यादी |
| **सा. क्र. ३/ नि. क्र. ११५** | मधुकर विठ्ठल ठोके | प्रत्यक्ष साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| **सा. क्र. ४/ नि. क्र. १४५** | दिनेश रामराव पवार | साक्षीदार |
| **सा. क्र. ५/ नि. क्र. १५६** | कैलास विठ्ठल ढोके | साक्षीदार |
| **सा. क्र. ६/ नि. क्र. १६५** | रामराव शंकर पवार | जखमी साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार** : आरोपीने पुरावा दिला नाही.

**क. न्यायालयीन साक्षीदार** : निरंक.

**४. अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचे दस्तास निशाणी बाबत यादी** :

**अ. अभियोग पक्षाचे निशाणी** :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| **१** | नि.क्र. ६८/ सा. क्र. १ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीस |
| **२** | नि.क्र. १०६/ सा. क्र. २ | फिर्याद |
| **३** | नि.क्र. १०७/ सा. क्र. २ | प्रथमखबर अहवालाची प्रत |

**ब. बचाव पक्षाचे निशाणी** : निरंक.

**क. न्यायालयाची निशाणी**: निरंक.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| **१** | नि. क्र. ५७ व ९५ | दोषारोप |
| **२** | नि. क्र. ५८ ते ६६ तसेच ९६ ते १०४ | फौ. प्र. सं. चे कलम २०७ प्रमाणे आरोपी क्र. १ ते ९ दोषरोपपत्राच्या नक्कल मिळाल्या व गुन्हा |

| | | |
|---|---|---|
| | | कबुल नसल्या बाबतचे निवेदन |
| ३ | नि. क्र. ४८ | आरोपी आरोपी क्र. १ ते ९ फौ. प्र. सं. चे कलम ३१३ प्रमाणे नोंदविलेले निंवदेन |

**ड. विशेष साहित्य** (**मटेरियल ऑब्जेक्ट**):

| अ.क्र. | अर्टीकल | विवरण |
|---|---|---|
| १ | अर्टीकल–अ | फावड |
| २ | अर्टीकल–ब | कु–हाड |
| ३ | अर्टीकल–क, ड, इ, फ | चार काठ्यास |

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२६ व ५०४ अन्वये दोषारोप पत्र दाखल केले आहे.

## अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे

**०२.** दिनांक ११/०७/२०१४ रोजी सायंकाळी सुमारे ५.०० वाजताच्या सुमारास वादळी वाऱ्यामुळे फिर्यादीच्या अंगणातील लिंबाचे झाड त्यांच्या जागेत पडले होते. त्यावेळी आरोपी क्र. १ नंदू हा कुऱ्हाड घेऊन फिर्यादीच्या जागेत जाऊन लिंबाच्या झाडाच्या फांद्या तोडू लागला. फिर्यादीचे वडील रामराव यांनी त्यास फांद्या तोडू नको असे सांगितले असता आरोपी नंदू याने त्यांना शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादीने मध्यस्थी करून आपल्या वडिलांना शिवीगाळ करू नको असे सांगितल्याने इतर आरोपी क्र. २ शिला, आरोपी क्र. ३ गजानन, आरोपी क्र. ४ रामहरी, आरोपी क्र. ५ अरुणा, आरोपी क्र. ६ छाया, आरोपी क्र. ७ विश्वनाथ, आरोपी क्र. ८ आशा व आरोपी क्र. ९ मयुरी हे तेथे

जमले व त्यांनी फिर्यादीशी वाद घातला. पुढे आरोपी क्र. ३ गजानन याने त्याच्या हातातील कुऱ्हाडीने फिर्यादीच्या डाव्या दंडावर व हातावर वार करून त्यास दुखापत केली. फिर्यादीस वाचविण्यासाठी कैलास विठ्ठल ढोके, मधुकर विठ्ठल ढोके, पदमिना रामराव पवार व सागर रामराव पवार हे मध्ये पडले असता आरोपींनी त्यांनाही कुऱ्हाडी व दगडांनी मारहाण करून दुखापत केली. सदर घटना गजानन अंबुरे, अशोकराव ढवक तसेच इतर उपस्थित व्यक्तींनी पाहिली. त्यानंतर फिर्यादीने सदर घटनेची फिर्याद दिली.

**०३.** सदर फिर्यादवरुन दारव्हा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. २५४/२०१४ हा भारतीय दंड संहीतेचे कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२६ व ५०४ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरक्षक अशोक डोंगरे दारव्हा पोलीस स्टेशन यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, प्रस्तुत गुन्हया संर्दभातील कागदपत्रे हस्तागत केले, साक्षीदारांचे जबाब नोंदवले, आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने त्यांनी आरोपी विरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२६ व ५०४ अन्वये न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**०४.** माझ्या पुर्वीचे पिठासन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२६ व ५०४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयांचा दोषारोप नि. क्र. ५७ व ९५ वर निश्चीत केला. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे कथन करुन संपरिक्षेची मागणी केली.

०५. अभिलेखावरील उपलब्ध पुरावा आणि दोषारोप पाहता, खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले. त्या प्रत्येक मुद्दयांचे निष्कर्ष मी नोंदविले असून, त्यांची कारणमिमांसा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि. ११/०७/२०१४ रोजी सायंकाळी सुमारे ५.०० वाजताच्या सुमारास नाखेगाव, ता. दारव्हा येथे आरोपींनी बेकायदेशीर जमाव (Unlawful Assembly) तयार करून भारतीय दंड संहितेच्या कलम १४३ अन्वये गुन्हा केला? | नाही |
| २ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, आरोपींनी सदर बेकायदेशीर जमावाचे सदस्य म्हणून दंगल (Rioting) केली व त्यामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम १४७ अन्वये गुन्हा केला? | नाही |
| ३ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, आरोपींनी प्राणघातक शस्त्र, म्हणजे कुऱ्हाड, हातात बाळगून दंगल केली व त्यामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम १४८ अन्वये गुन्हा केला? | नाही |
| ४ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, आरोपींनी बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशाच्या पूर्ततेसाठी फिर्यादी गणेश रामराव पवार व इतर जखमींना कुऱ्हाड व दगडाने मारहाण करून गंभीर दुखापत केली व त्यामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला? | नाही |
| ५ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, आरोपींनी | नाही |

| | | |
|---|---|---|
| | फिर्यादीस जाणूनबुजून शिवीगाळ करून शांततेचा भंग होईल अशा प्रकारे अपमान केला व त्यामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला? | |
| ६ | कोणता आदेश? | आरोपींची निर्दोष मुक्त करण्यात येते. |

**– : कारणमिमांसा :–**

**मुद्दा क्र. १ ते ३**

***मुद्दा क्र. १ :*** *अभियोग पक्ष हे शाबीत करतो काय की आरोपींनी बेकायदेशीर जमाव तयार करून भारतीय दंड संहीतीचे कलम १४३ अन्वये गुन्हा केला?*

***मुद्दा क्र. २ :*** *अभियोग पक्ष हे शाबीत करतो काय की आरोपींनी बेकायदेशीर जमावाचे सदस्य म्हणून दंगल करून भारतीय दंड संहीतीचे कलम १४७ अन्वये गुन्हा केला?*

***मुद्दा क्र. ३ :*** *अभियोग पक्ष हे शाबीत करतो काय की आरोपींनी प्राणघातक शस्त्र म्हणजे कुऱ्हाड हातात घेऊन दंगल करून भारतीय दंड संहीतीचे कलम १४८ अन्वये गुन्हा केला?*

**०६.** वरील तिन्ही मुद्दे परस्परांशी निगडित असल्याने त्यांचा एकत्रित विचार करण्यात येत आहे.

**०७.** अभियोग पक्षाचा युक्तिवाद की, दिनांक ११/०७/२०१४ रोजी सायंकाळी सुमारे ५.०० वाजता आरोपींनी एकत्र येऊन बेकायदेशीर जमाव तयार केला. आरोपी क्र.१ नंदू नागोराव गायकवाड व आरोपी गजानन नागोराव गायकवाड यांच्या हातात कुऱ्हाडी होत्या, तर इतर आरोपींच्या हातात दगड व काठ्या होत्या. सर्व आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादी व त्याच्या नातेवाईकांवर हल्ला करून त्यांना दुखापत केली. त्यामुळे आरोपींचे कृत्य भारतीय दंड संहितेच्या कलम १४३, १४७ व १४८ मध्ये सामाविष्ट होते.

**०८.** याउलट आरोपीच्या विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये घटनास्थळावरील जागा व त्या ठिकाणी असलेल्या झाडाच्या मालकीबाबत पूर्वीपासून दिवाणी वाद सुरू होता. आरोपींनी प्रथम तक्रार दिल्यानंतर सूडबुद्धीने फिर्यादीने सदर खोटी फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादी व त्याचे नातेवाईक हेच आरोपींवर हल्ला करण्यासाठी गेले होते. आरोपींनी स्वतःच्या बचावासाठी प्रतिकार केला असून, आरोपींविरुद्ध खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा विश्वासार्ह नाही.

**०९.** प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी गणेश रामराव पवार (साक्षीदार क्र.–२), मधुकर विठ्ठल ढोके (साक्षीदार क्र. –३), रामराव शंकर पवार (साक्षीदार क्र. – ६) यांनी अभियोग पक्षास पाठिंबा दिलेला आहे. तथापि, घटनास्थळ पंच गजानन अशोकराव ढवक (साक्षीदार क्र.–१) यांनी पंचनामा सिद्ध केलेला नाही. त्यांनी पंचनाम्याचा मजकूर माहित नसल्याचे सांगून अभियोग पक्षास साह्य केले नाही. त्याचा उलटतपास परवानगी देण्यात

आली असली तरी अभियोग पक्षास त्यांच्याकडून कोणतीही महत्त्वाची बाब सिद्ध करता आलेली नाही.

**१०.** तसेच साक्षीदार क्र. –५ कैलास विठ्ठल ढोके यांनी देखील "मला घटनेबाबत काही आठवत नाही" असे सांगून अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचे दोन महत्त्वाचे साक्षीदार यांनी अभियोग पक्षास साह्य केले नाही. त्यामुळे त्यांच्या साक्षेचा अभियोग पक्षाला कोणताही विशेष लाभ होत नाही.

**११.** साक्षीदार क्र. – २ गणेश पवार हा स्वतः जखमी असल्यामुळे त्याची साक्ष महत्त्वाची आहे. तथापि, त्याच्या साक्षीचे अवलोकन करताना न्यायालयास काही स्पष्ट विसंगती आढळून येतात. फिर्यादीमधे फिर्यादीने आरोपी क्र. ३ गजानन गायकवाड याने कुऱ्हाडीने मारल्याचे नमूद केले आहे; परंतु न्यायालयातील साक्षीत साक्षीदार क्र.–२ यास आरोपी क्र. १ नंदू गायकवाड याने कुऱ्हाडीने मारल्याचे सांगितले आहे. ही विसंगती अत्यंत मूलभूत स्वरूपाची असून, जखम कोणी केली या बाबतच अभियोग पक्षाच्या कथनात बदल झालेला दिसतो. अशा प्रकारचा विरोधाभास दुर्लक्ष करण्यासारखा नाही.

**१२.** साक्षीदार क्र. –३ मधुकर ढोके यांनी आरोपींच्या हातात कुऱ्हाडी, दगड व काठ्या असल्याचे सांगितले आहे. परंतु त्यांच्या साक्षीला स्वतंत्र व निष्पक्ष साक्षीदारांचा आधार मिळत नाही. साक्षीदार क्र.–४ दिनेश पवार यांनी स्वतः घटना प्रत्यक्ष पाहिली

नसल्याचे उलटतपासात स्पष्ट कबूल केले आहे. त्यामुळे त्यांची साक्ष प्रत्यक्षदर्शी साक्ष मानता येत नाही.

**१३.** याशिवाय साक्षीदार क्र. –२, साक्षीदार क्र. –३, साक्षीदार क्र. –४ व साक्षीदार क्र. –६ हे सर्व फिर्यादीचे नातेवाईक असून त्यांचा आरोपींसोबत पूर्वीपासून जमिनीच्या वादामुळे संघर्ष सुरू असल्याचे त्यांच्या उलटतपासामध्ये स्पष्ट झाले आहे. केवळ नातेवाईक साक्षीदार असल्यामुळे त्यांची साक्ष नाकारता येत नसली तरी अशा साक्षीचे न्यायालयाने अधिक काळजीपूर्वक अवलोकन करणे आवश्यक असते. जर स्वतंत्र साक्षीदारांचा आधार मिळत नसेल आणि साक्षींमध्ये महत्त्वाचे विरोधाभास आढळत असतील तर अशा साक्षीवर संपूर्ण दोषसिद्धी करणे सुरक्षित मानता येत नाही.

**१४.** आरोपी पक्षाने उलटतपासामध्ये फिर्यादी पक्षाविरुद्ध आरोपींकडूनही त्याच घटनेबाबत तक्रार दाखल झाल्याचे, दोन्ही पक्षांमध्ये प्रतिगुन्हा (Cross Case) प्रलंबित असल्याचे तसेच झाड व जागेच्या मालकीबाबत दिवाणी वाद चालू असल्याचे समोर आणले आहे. साक्षीदार क्र.–२, साक्षीदार क्र.–४ व साक्षीदार क्र.–६ यांनीही अशा वादाचे अस्तित्व मान्य केले आहे. त्यामुळे या घटनेमागे पूर्ववैमनस्य असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत अभियोग पक्षाचा पुरावा अधिक काटेकोरपणे तपासणे आवश्यक ठरते.

**१५.** अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष तपासलेली नाही. त्यामुळे जखमांचे स्वरूप, त्या कुऱ्हाडीने झाल्या की इतर कोणत्या कारणाने, त्या गंभीर स्वरूपाच्या

होत्या का, याबाबतचा सर्वोत्कृष्ट पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. तपासी अधिकाऱ्याचे निधन झाल्यामुळे त्यांची साक्ष उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे तपासातील त्रुटी किंवा पंचनामे, जप्ती व साक्षीदारांचे जबाब यांची शहानिशा होणे शक्य झाले नाही. जरी तपासी अधिकाऱ्याचा मृत्यू हा अभियोग पक्षाच्या नियंत्रणाबाहेरील प्रकार असला, तरी त्याचा परिणाम पुराव्याच्या मूल्यमापनावर होतो.

**१६.** भारतीय दंड संहितेच्या कलम १४३, १४७ व १४८ अंतर्गत दोषसिद्धीसाठी अभियोग पक्षाने हे निर्विवादपणे सिद्ध करणे आवश्यक असते की, आरोपींनी समान उद्देशाने बेकायदेशीर जमाव तयार केला होता व त्या समान उद्देशाच्या पूर्ततेसाठी दंगल केली होती. केवळ अनेक व्यक्ती घटनास्थळी उपस्थित होत्या म्हणून कलम १४९ लागू होत नाही. समान उद्देश व प्रत्येक आरोपीचा सक्रिय सहभाग विश्वासार्ह पुराव्याद्वारे सिद्ध होणे आवश्यक असते.

**१७.** प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध पुराव्यावरून सर्व आरोपींनी समान उद्देशाने बेकायदेशीर जमाव तयार केला होता, हे संशया पलीकडे जावुन सिद्ध झाले नाही. अभियोग पक्षाच्या साक्षींमध्ये परस्परविरोध, स्वतंत्र साक्षीदारांचा अभाव, पंच साक्षीदार साह्य न करणे, वैद्यकीय पुरावा न सादर होणे, तपासी अधिकाऱ्याची साक्ष उपलब्ध नसणे, प्रतिगुन्हा व दिवाणी वाद या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता आरोपींना संशयाचा फायदा देणे आवश्यक ठरते. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहीतीचे कलम

१४३, १४७ व १४८ अन्वये गुन्हा संशया पलीकडे जावुन सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे. करीता मी मुद्दा क्र. १ ते ३ यांची उत्तरे नकारार्थी नोंदवितो.

**मुद्दा क्र. ४ :**

***अभियोग पक्ष हे शाबीत करतो काय की, आरोपींनी बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशाच्या पूर्ततेसाठी फिर्यादी गणेश रामराव पवार व इतर जखमींना कुऱ्हाड व दगडाने मारहाण करून त्यांना गंभीर दुखापत केली व त्यामुळे भारतीय दंड संहीतीचे कलम ३२६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला?***

**१८.** अभियोग पक्षाचा युक्तिवाद की, आरोपी क्र. १ नंदू व आरोपी क्र. ३ गजानन यांच्या हातात कुऱ्हाड होती. आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादी गणेश रामराव पवार तसेच त्याला सोडविण्यास आलेल्या मधुकर ढोके, कैलास ढोके, पद्मिनी पवार, सागर पवार यांना कुऱ्हाड व दगडाने मारहाण केली. फिर्यादीच्या हातावर कुऱ्हाडीचा वार होऊन त्यास गंभीर दुखापत झाली. त्यामुळे आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ सह १४९ मधील गुन्हा सिद्ध झालेला आहे.

**१९.** आरोपींच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, संपूर्ण घटना ही झाड व जागेच्या मालकीवरील दिवाणी वादातून उद्भवलेली आहे. आरोपींनी प्रथम पोलिसांत तक्रार दिल्यानंतर प्रत्युत्तरादाखल सदर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी पक्षच आरोपींवर हल्ला करण्यासाठी गेला होता. फिर्यादीने न्यायालयात दिलेली साक्ष प्रथम खबरी

अहवालाशी विसंगत आहे. वैद्यकीय अधिकारी तपासलेला नाही. तपासी अधिकाऱ्याची साक्षही उपलब्ध नाही. त्यामुळे गंभीर दुखापत व आरोपींचा सहभाग संशयापलीकडे सिद्ध झालेला नाही.

२०. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता, प्रथमदर्शनी फिर्यादी गणेश पवार (साक्षीदार क्र.–२) हा जखमी साक्षीदार असल्यामुळे त्याच्या साक्षीला विशेष महत्त्व प्राप्त होते. तथापि, जखमी साक्षीदाराची साक्ष देखील इतर उपलब्ध पुराव्याशी सुसंगत असणे आवश्यक असते. सदर प्रकरणात फिर्यादीने फिर्यादी मध्ये आरोपी क्र. ३ गजानन गायकवाड याने कुऱ्हाडीने मारल्याचे नमूद केले आहे; परंतु न्यायालयात साक्ष देताना आरोपी क्र. १ नंदू गायकवाड याने कुऱ्हाडीचा वार केल्याचे सांगितले आहे. जखम करणाऱ्या व्यक्तीबाबतचा हा विरोधाभास अत्यंत महत्त्वाचा असून तो अभियोग पक्षाच्या विश्वासार्हतेवर परिणाम करणारा आहे.

२१. साक्षीदार क्र. –३ मधुकर ढोके यांनी देखील आरोपींनी कुऱ्हाड व दगडाने मारहाण केल्याचे सांगितले आहे. मात्र त्यांची साक्ष स्वतंत्र साक्षीदारांनी पुष्टी केलेली नाही. साक्षीदार क्र.–४ दिनेश पवार यांनी उलटतपासात त्यांनी प्रत्यक्ष घटना पाहिली नसल्याचे स्पष्ट कबूल केले आहे. साक्षीदार क्र.–५ कैलास ढोके यांनी तर घटनेबाबत काहीही आठवत नसल्याचे सांगून अभियोग पक्षाला साह्य केले नाही. साक्षीदार क्र.–१ पंच साक्षीदार देखील साह्य केले नाही. त्यामुळे अभिंयोग पक्षाचा प्रत्यक्ष व स्वतत्र पुरावा अत्यंत कमकुवत राहिलेला आहे.

२२. कलम ३२६ भारतीय दंड संहितेअंतर्गत दोषसिद्धीसाठी अभियोग पक्षाने हे सिद्ध करणे आवश्यक आहे की, आरोपीने धोकादायक शस्त्राने गंभीर दुखापत (Grievous Hurt) केली आहे. गंभीर दुखापत झाली की नाही, हा प्रश्न मुख्यतः वैद्यकीय पुराव्याद्वारे सिद्ध होणे अपेक्षित असते.

२३. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकारी यांना न्यायालयात तपासलेले नाही. त्यामुळे जखमांचे स्वरूप, त्या भारतीय दंड संहितेच्या कलम ३२० मधील गंभीर दुखापतीच्या व्याख्येत येतात की नाही, त्या कुऱ्हाडीमुळेच झाल्या की अन्य कारणाने झाल्या, याबाबत कोणताही तज्ज्ञ पुरावा न्यायालयासमोर उपलब्ध नाही. केवळ जखमी साक्षीदाराच्या म्हणण्यावरून जखम गंभीर असल्याचा निष्कर्ष काढणे सुरक्षित ठरत नाही. अभियोग पक्षाने तपासी अधिकाऱ्यालाही तपासलेले नाही. नोंदीवरून तपासी अधिकाऱ्याचे निधन झाल्यामुळे त्यांची साक्ष नोंदविणे शक्य झाले नाही. त्यामुळे तपासातील त्रुटी, जप्ती, घटनास्थळ पंचनामा, शस्त्र जप्ती व साक्षीदारांचे जबाब याबाबत न्यायालयास आवश्यक स्पष्टीकरण उपलब्ध झाले नाही. तपासी अधिकाऱ्याचे निधन हा अभियोग पक्षाचा दोष नसला तरी त्याचा परिणाम पुराव्याच्या मूल्यमापनावर होतो.

२४. उलटतपासामध्ये साक्षीदार क्र. –२, साक्षीदार क्र. –४ व साक्षीदार क्र. –६ यांनी आरोपी व फिर्यादी यांच्यात जागेच्या मालकीचा दिवाणी वाद प्रलंबित असल्याचे मान्य केले आहे. तसेच आरोपींकडूनही फिर्यादी पक्षाविरुद्ध प्रतितक्रार दाखल करण्यात आली होती, हेही समोर आले आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये पूर्वीपासून वैमनस्य असल्याचे

स्पष्ट होते. अशा परिस्थितीत नातेवाईक साक्षीदारांच्या साक्षीचे अवलोकन अधिक सावधगिरीने करणे आवश्यक असते. भारतीय पुरावा अधिनियमातील तत्त्वानुसार दोषसिद्धीसाठी अभियोग पक्षाने आपला आरोप संशया पलीकडे जावुन सिद्ध करणे आवश्यक असते. जर उपलब्ध पुराव्यावरून दोन शक्यता निर्माण होत असतील, त्यापैकी आरोपीच्या निर्दोषत्वाची शक्यता वाजवी वाटत असेल, तर त्यास संशयाचा फायदा देणे हे न्यायशास्त्राचे मूलभूत तत्त्व आहे.

२५. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीच्या साक्षीतील महत्त्वाचे विरोधाभास, स्वतंत्र साक्षीदारांचा अभाव, पंच साक्षीदार व एका जखमी साक्षीदाराचे फितूर होणे, वैद्यकीय अधिकाऱ्याची साक्ष नसणे, तपासी अधिकाऱ्याच्या निधनामुळे तपासाची पडताळणी न होणे, तसेच दोन्ही पक्षांतील पूर्ववैमनस्य व प्रतिगुन्हा या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता, आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादीस गंभीर दुखापत केल्याचा आरोप अभियोग पक्षाला संशयापलीकडे जावुन सिद्ध करता आलेला नाही. त्यामुळे, आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा सिद्ध झाला नाही. करीता मी, मुद्दा क्र. ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र. ५ :</u>**

***अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, आरोपींनी फिर्यादीस जाणूनबुजून शिवीगाळ करून सार्वजनिक शांततेचा भंग होईल अशा प्रकारे अपमान केला व त्यामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला?***

**२६.** अभियोग पक्षाचा युक्तिवाद असा की, आरोपी क्र. १ नंदू नागोराव गायकवाड यास फिर्यादीचे वडील रामराव पवार यांनी लिंबाच्या झाडाच्या फांद्या तोडण्यास मनाई केली असता त्याने त्यांना अश्लील शिवीगाळ केली. फिर्यादीने मध्यस्थी केल्यानंतर सर्व आरोपी तेथे जमा झाले व त्यांनी फिर्यादी व त्याच्या नातेवाईकांशी शिवीगाळ करून वाद घातला. आरोपींचे वर्तन हे सार्वजनिक शांततेचा भंग होईल अशा स्वरूपाचे असल्याने भारतीय दंड संहितेच्या कलम ५०४ अन्वये त्यांचा गुन्हा सिद्ध होतो, असा अभियोग पक्षाचा युक्तिवाद आहे.

**२७.** आरोपीच्या विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये पूर्वीपासून दिवाणी वाद सुरू होता. सदर तक्रार ही सूडबुद्धीने दाखल करण्यात आली आहे. कथित शिवीगाळ कोणत्या शब्दांत करण्यात आली, कोणत्या आरोपीने केली आणि त्यामागे शांततेचा भंग घडवून आणण्याचा हेतू होता, याचा कोणताही विश्वासार्ह पुरावा अभियोग पक्षाने सादर केलेला नाही. त्यामुळे कलम ५०४ मधील आवश्यक घटक सिद्ध होत नाहीत.

**२८.** अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन करता, साक्षीदार क्र. –२ गणेश पवार, साक्षीदार क्र. –३ मधुकर ढोके व साक्षीदार क्र. –६ रामराव पवार यांनी आरोपींनी शिवीगाळ केल्याचे सर्वसाधारण स्वरूपात नमूद केले आहे. तथापि, कोणत्या आरोपीने कोणते अपमानास्पद शब्द उच्चारले, ते शब्द नेमके काय होते, त्या शब्दांमुळे तात्काळ

शांततेचा भंग होण्याची शक्यता कशी निर्माण झाली, याबाबत कोणत्याही साक्षीदाराने स्पष्ट व ठोस माहिती दिलेली नाही.

२९. भारतीय दंड संहितेच्या कलम ५०४ अंतर्गत दोषसिद्धीसाठी केवळ शिवीगाळ झाल्याचे सिद्ध करणे पुरेसे नसते. अभियोग पक्षाने हे देखील सिद्ध करणे आवश्यक असते की, अपमान हा जाणीवपूर्वक (Intentional Insult) करण्यात आला होता आणि त्या अपमानामुळे संबंधित व्यक्तीकडून शांततेचा भंग होईल किंवा गुन्हा करण्यास प्रवृत्त होईल, असा आरोपीचा हेतू किंवा ज्ञान होते.

३०. सर्वोच्च न्यायालयाने विविध निर्णयांत स्पष्ट केले की, प्रत्येक प्रकारची शिवीगाळ किंवा वाद हा भारतीय दंड संहितेच्या कलम ५०४ अंतर्गत गुन्हा ठरत नाही. त्या अपमानामागील हेतू आणि त्याचा परिणाम सिद्ध होणे आवश्यक असते. सदर प्रकरणात फिर्यादी व आरोपी यांच्यातील वाद हा झाड व जागेच्या मालकीच्या प्रश्नावरून अचानक उद्भवलेला असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत काही शाब्दिक वाद झाला असण्याची शक्यता नाकारता येत नसली, तरी तो कलम ५०४ अंतर्गत येणारा जाणूनबुजून केलेला अपमान होता, हे अभियोग पक्ष विश्वासार्ह व ठोस पुराव्याने सिद्ध करू शकलेला नाही.

३१. याशिवाय, स्वतंत्र साक्षीदारांनीही कथित शिवीगाळीची पुष्टी केलेली नाही. पंच साक्षीदार व इतर महत्त्वाचे साक्षीदार अभियोग पक्षाला पूर्णपणे साथ देत नाहीत. त्यामुळे या बाबतीतही अभियोग पक्षाच्या पुराव्यावर संपूर्ण विश्वास ठेवणे सुरक्षित ठरत नाही.

फौजदारी प्रकीयानुसार आरोपींच्या वर ठेवण्यात आलेले आरोप हे संशयापलीकडे जावुन सिद्ध करणे ही अभियोग पक्षाची जबाबदारी आहे. सदर प्रकरणात आरोपींनी कलम ५०४ सह १४९ भारतीय दंड संहितेअंतर्गत गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्ष संशया पलीकडे जावुन सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे. त्यामुळे मी, मुद्दा क्र. ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो.

**मुद्दा क्र. ६ : काय आदेश?**

**३२.** मुद्दे क्र. १ ते ५ यांच्या आलेल्या निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते की, अभियोग पक्ष आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम **१४३, १४७, १४८, ३२६ सह १४९ आणि ५०४ सह १४९** अंतर्गत लावण्यात आलेले आरोप हे संशया पलीकडे जावुन सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे. अभियोग पक्षाच्या पुराव्यात महत्त्वपूर्ण त्रुटी राहिलेल्या आहेत. प्रथम खबरी अहवाल व न्यायालयातील साक्ष यामध्ये मूलभूत विसंगती आढळते. स्वतंत्र पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास साथ दिलेली नाही. दोन महत्त्वाचे साक्षीदार फितूर झालेले आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्याची साक्ष उपलब्ध नाही. तपासी अधिकाऱ्याचे निधन झाल्यामुळे त्यांचा पुरावा नोंदविता आलेला नाही. दोन्ही पक्षांमध्ये पूर्वीपासून दिवाणी वाद व प्रतिगुन्हा अस्तित्वात असल्याचेही पुराव्यातून स्पष्ट होते. या सर्व परिस्थितीमुळे अभियोग पक्षाची कथन संशयमुक्त राहत नाही.

३३. न्यायालयाचे सुस्थापित तत्त्व लक्षात घेता, **"संशय कितीही प्रबळ असला तरी तो पुराव्याची जागा घेऊ शकत नाही."** फौजदारी खटल्यात दोषसिद्धी ही केवळ खात्रीलायक, विश्वासार्ह व वाजवी शंकेपलीकडील पुराव्यावरच आधारित असली पाहिजे. सदर प्रकरणात असा दर्जाचा पुरावा उपलब्ध झालेला नाही. म्हणून आरोपींना संशयाचा फायदा देणे आवश्यक असून त्यांची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित ठरते. तसेच प्रस्तुत प्रकरणात अर्टीकल–अ वरील फावडे, अर्टीकल–ब वरील कु–हाड, अर्टीकल–क, ड, इ, फ वरील चार लाकडी काठ्या या सर्व मुद्देमाल हे मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी नंतर नष्ट करावे. करीता मी मुद्दा क्र. ६ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## आ दे श

१. आरोपी क्र. १ **नंदु नागोराव गायकवाड,** आरोपी क्र. २ **शिला नागोराव गायकवाड,** आरोपी क्र. ३ **गजानन नागोराव गायकवाड,** आरोपी क्र. ४ **रामहरी नागोराव गायकवाड,** आरोपी क्र. ५ **अरुणा चंद्रकांत गायकवाड,** आरोपी क्र. ६ **छाया दत्ता ढोके,** आरोपी क्र. ७ **विश्वनाथ परसराम गायकवाड,** आरोपी क्र. ८ **आशा विश्वनाथ गायकवाड,** आरोपी क्र. ९ **मयुरी विश्वनाथ गायकवाड** यांची भारतीय दंड संहितेच्या कलम १४३, १४७, १४८, ३२६ सह १४९ आणि ५०४ सह १४९ अन्वये असलेल्या आरोपांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २४८(१) अन्वये **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

२. आरोपींनी दिलेले जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या अंतर्गत सहा महिन्याच्या कालावधीकरीता प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/– चा जातमुचलक्याचे बंधपत्र द्यावे व सदर सहा महीनाचा कालावधी संपल्यानंतर त्यांचे बंधपत्र रद्द होवून आरोपीची पुर्णतः मुक्त करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत गुन्हयाच्या तपासाकामी जप्त असलेला मुद्देमाल फावडे, कु–हाड, चार लाकडी काठ्या हे सर्व मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी नंतर कायदेशार मार्गाने त्याची विल्हेवाट लावावी.

NILESH LAXMANRAO PATIL
Digitally signed by NILESH LAXMANRAO PATIL
Date: 2026.07.06 16:47:19 +0530

**दिनांक – ०६/०७/२०२६.** **(निलेश ल. पाटील)**

**ठिकाण –** दारव्हा, जि. यवतमा

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय. क्र. २), दारव्हा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| **Name of Stenographer** | : | Ku Divya R. Gaikwad<br>Stenographer (Grade 3) |
| **Court Name** | : | 2nd Jt. CJJD & JMFC Darwha |
| **Date** | : | 06/07/2026 |
| **Judgment signed by presiding officer on** | : | 06/07/2026 |
| **Judgment uploaded on** | : | 06/07/2026 |